**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**
**समाजकार्य विभाग**

दि. - १९ ऑगस्ट २०१३

**बातमी**

**'गुन्हे न्याय व्यवस्थेत समाजकार्यकर्त्याची भूमिका महत्वपूर्ण' मीरा बोरवणकर, अप्पर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक**

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील समाजकार्य विभाग गुन्हे न्याय व्यवस्थेत गेली दोन वर्षे कार्य करीत आहे. या अंतर्गत २०११ पासून मा. मीरा बोरवणकर या पुणे शहर पोलीस आयुक्त असताना त्यांच्या प्रयत्नातून तीन पोलीस स्टेशन मध्ये व नोव्हेंबर २०१२ पासून येरवडा कारागृहात विद्यार्थी क्षेत्रीयकार्य करत आहेत. विभागाव्दारे विद्यार्थ्यांना वेळोवेळी अद्ययावत ज्ञान व कौशल्ये देण्याचा प्रयत्न केला जातो. २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीस दि. १९ ऑगस्ट २०१३ रोजी मा. श्रीमती. मीरा चड्डा बोरवणकर यांना "गुन्हे न्याय व्यवस्थेत समाजकार्य हस्तक्षेपाची गरज व भूमिका" या विषयावर विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला.

या प्रसंगी त्या म्हणाल्या, 'समाजातील गुन्ह्यांचे प्रमाण व गुन्हे न्याय व्यवस्थेतील कर्मचारी यांच्या प्रमाणात खूप तफावत असल्यामुळे या क्षेत्रात व्यावसायिक समाजकार्यकर्त्याची भूमिका महत्वपूर्ण आहे. समाजकार्यकर्त्यांचा पूर्व ग्रह विरहित दृष्टिकोन, त्यांच्याकडे असणारी व्यावसायिक कौशल्ये तसेच अशासकीय संस्थांच्या सहयोगाने या क्षेत्रात अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जाऊ शकतात'. प्रशिक्षित समाजकार्यकर्त्याच्या अंगी सृजनशीलता, सकारात्मक दृष्टिकोन, नेतृत्व गुण, विश्लेषण करण्याची क्षमता इ. गुण असणे आवश्यक आहे असे त्यांनी आपल्या व्याख्यानात नमूद कले. कारागृह प्रशासनामधील व्यावसायिक समाजकार्यकर्त्याची भूमिका व गरज आपल्या कारकिर्दीतील विविध अनुभवांच्या आधारे त्यांनी स्पष्ट केली.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक विभागाच्या सहा. प्रा. केतकी गोखले , मान्यवरांचा परिचय सहा. प्रा. गीता जोशी व आभार प्रदर्शन सहा. प्रा. कार्तिकी सुबकडे यांनी केले. सदर कार्यक्रम आयोजित करण्यासाठी मा. कुलगुरू डॉ. दीपक टिळक, मा. कुलसचिव डॉ. उमेश केसकर, मा. प्राचार्या, शिक्षणशास्त्र विभाग डॉ. नीलिमा मेहता व मा. विभागप्रमुख प्रकाश यादव यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.